



दैनिक

मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध

# अक्षराज

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे   Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

जी इच्छा मनातून आणि शुद्ध अंतकरणातून
निघत असते व जे खूप तीव्र देखील असते,
त्यात खूपच जास्ती
सकारात्मक ऊर्जा समाविष्ट असते...


● वर्ष ०३ रे ● अंक ३२ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये | ठाणे, सोमवार, दि.२४ नोव्हेंबर २०२५ | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

● YEAR : 03 ● ISSUE : 32 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 | THANE, Monday, 24 November 2025 | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023


## ताम्हिणीनंतर तोरंगण घाटात भीषण अपघात
## ५० जणांसह निघालेल्या आयशरचा ब्रेक फेल

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नाशिक :** मोखाडा त्रंबकेश्वर रस्त्यावरील तोरंगण घाटात एक आयशर ट्रकचा मोठा अपघात झाला असून यामध्ये प्रवासी असलेल्या सुभाष दिवे (२८) मु.हाडे जव्हार याचा जागीच मृत्यू झाला आहे तर ३० हूनअधिक जखमही झाले. हे सर्वजण मजुरीच्या शोधात निघाले होते. गंभीर जखमींना उपचारासाठी त्रबकेश्वर आणि नाशिक जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.तर काही जखमींवर म ोखाडा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत यातील काहींची स्थिति नाजूक असल्याचे सांगण्यात येत आहे तर काहींना मोठ्याप्रमाणावर मुका मार लागल्याचे दिसून येत आहे यातील सर्वच



जखमींची नावे अद्याप कळाली नसली तरी मोखाडा ग्रामीण रुग्णालयात मात्र एकच गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले. मोखाडा तालुक्यातील अनेक मजूर रोजगाराच्या शोधात नाशिक या ठिकाणी कामासाठी जातात हे मजूर रोजंदारीच्या शोधात जात असल्याने कमी पैशांमध्ये प्रवास व्हावा यासाठी मालवाहतूक करणाऱ्या अनेक वाहनांचा आधार घेत असतात. अशावेळी सहा ते सातच्या आसपास नाशिक वरून मोखाड्याकडे येणाऱ्या एका आयशर ट्रक मध्ये तब्बल पन्नास हून अधिक मजूर बसले होते, यानंतर तोरंगण घाटात या ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.


ही घटना रात्री आठ वाजता घडल्याने मोखाडा ग्रामीण रुग्णालयात याबाबत कळविण्यात आल्यानंतर रुग्णवाहिकेद्वारे या सर्व जखमींना म ोखाडा ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले यातील एकाच्या जागीच मृत्यू झाला आहे तर ४० हून अधिक जखम ींवर उपचार सुरू आहेत. यातील ज्यांची परिस्थिती नाजूक आहे त्यांना नाशिक रुग्णालयात देखील हलविण्यात आले आहे.

## ९० वर्षीय हिराबाईच्या मृत्यूचे गूढ उकलले...
## पोस्ट मॉर्टम रिपोर्टमधून खळबळजनक सत्य समोर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, रायगड :** उरण तालुक्यातील मोठे भोम गावात ९ नोव्हेंबर रोजी ९० वर्षीय हिराबाई जनार्दन जोशी यांची क्रूर हत्या करण्यात आली. उरण पोलिसांच्या तपासात धक्कादायक माहिती उघडकीस आली असून हिराबाईंचा मृत्यू नैसर्गिक नसून त्यांना बेदम मारहाण करून ठार म ारण्यात आल्याचं स्पष्ट झालं आहे. घटनास्थळी रक्ताने माखलेल्या लाकडी पट्ट्या सापडल्या असून, शवविच्छेदन अहवालानुसार त्यांच्या शरीरावर अनेक गंभीर जखमा आढळल्या आहेत. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

उरण पोलिसांच्या तपासात हिराबाई जोशी यांच्या मृत्यूचे गूढ उकलले आहे. ९ नोव्हेंबर रोजी मोठे भोम गावात हिराबाई जनार्दन जोशी मृतावस्थेत आढळल्या होत्या. प्राथमिक तपासात




हे स्पष्ट झालं आहे की, हिराबाईंचा मृत्यू नैसर्गिक नव्हता. त्यांना बेदम मारहाण करून त्यांची हत्या करण्यात आल होती. घटनास्थळी मिळालेल्या पुराव्यांनुसार पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी एक विशेष पथक तयार करण्यात आलं आहे. शवविच्छेदन अहवालानुसार, हिराबाईंच्या शरीरावर टणक वस्तूने मारहाणीच्या अनेक गंभीर जखमा होत्या. डोक्यापासून छातीपर्यंत, तसेच हात-पायांवरही मारहाणीच्या खुणा आढळल्या. घटनास्थळी रक्ताने माखलेल्या दोन तुटलेल्या लाकडी पट्ट्या सापडल्या. यावरून हत्येची क्रूरता स्पष्ट झाली आहे.

**➤जमीन व्यवहारातून मिळाले होते पैसे...**

प्राथमिक तपासात महत्त्वाची माहिती उरण पोलिसांच्या हाती लागली आहे. हिराबाई यांनी नुकत्याच विकलेल्या चार गुंठे जमिनीतून त्यांना १५ लाख रुपये मिळाले होते. यातील पाच ते सहा लाख रुपये त्यांनी आपल्या नातेवाइकांना दिले होते. पैशांच्या वाटपावरून झालेल्या वादाम ुळेच ही हत्या झाली असावी, अशी शक्यता अधिक बळावली आहे. उरण पोलीस या दिशेने सखोल चौकशी करत आहेत.

दरम्यान, या घटनेमुळे उरण परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. नागरिकांनी आरोपींचा लवकर शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलीस या प्रकरणाला गांभीर्याने घेत असून, तातडीने आरोपींना शोधून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

## नवे शैक्षणिक धोरण : शिक्षकांसाठी संधी व आव्हाने' कार्यशाळा संपन्न



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, नवी मुंबई :** म हानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे 'नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: शिक्षकांसाठी संधी व आव्हाने' या विषयावर विशेष व्याख्यानसत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास शहरातील सर्व व्यवस्थापनांच्या व माध्यमांच्या शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या विशेष उपक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून चेंबूर येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य आणि मुंबई विद्यापीठाचे असोसिएट डीन डॉ. चंद्रशेखर चक्रदेव उपस्थित होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातून नवीन शैक्षणिक धोरणाची (एनइपी) उद्दिष्टे स्पष्ट करतानाच यामुळे शिक्षकांसमोर निर्माण होणाऱ्या आव्हानांचे संधीमध्ये रूपांतर कसे करावे यावर सखोल मार्गदर्शन केले.

बदलत्या काळात शिक्षकांनी स्वतःला अद्यावत ठेवणे किती गरजेचे आहे हे त्यांनी सोदाहरण पटवून दिले. या कार्यक्रमात 'प्रथम' संस्थेच्या फरीदा लांबे यांनीदेखील ऑनलाईन उपस्थित राहून शिक्षकांशी थेट सुसंवाद साधला. त्यांनी शिक्षकांच्या प्रश्नांची उत्तरे दिली आणि विद्यार्थी घडवताना प्रत्यक्ष येणाऱ्या व्यावहारिक अडचणींवरही चर्चा केली.

हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम नवी मुंबई महानगर पालिका शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांच्या नियंत्रणाखाली आयोजित करण्यात आला होता. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात या कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.

याप्रसंगी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी उपस्थित राहून शिक्षकांशी संवाद साधला. कार्यक्रमाची सांगता करताना आयुक्तांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देऊन त्यांचे सातत्याने मूल्यमापन होण्याची गरज विशद केली. त्यादृष्टीने शिक्षण प्रणालीमध्ये सुधारणा करणे, शिक्षकांची कौशल्ये वाढविणे आणि विद्यार्थ्यांना आधुनिक युगातील आव्हानांसाठी तयार करणे हे या नवे शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे हे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यशाळेस नवी मुंबईतील प्राथमिक, माध्यमिक आणि कनिष्ठ म हाविद्यालयांमधील सर्व व्यवस्थापन व माध्यमांचे मुख्याध्यापक आणि शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते. या व्याख्यानाचा लाभ उपस्थित बहुसंख्य शिक्षकांनी घेतला. या कार्यशाळा आयोजनासाठी शिक्षणाधिकारी अशोक कडुस, सहाय्यक आयुक्त दिपाली दिवेकर, सर्व केंद्र समन्वयक यांचे योगदान लाभले.

## टाकळी ढोकेश्वर येथिल सौर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर
### शेतक-याना दिवसा वीज पुरवठ्याचा मार्ग मोकळा...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** टाकळी ढोकेश्वरच्या सरपंच अरुणा खिलारी पाटील यांच्या पुढाकारातून मंजूर होऊन मार्गी लागलेल्या काही वर्षापासून कार्यान्वित होण्याच्या प्रतीक्षेत असलेला पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल सौरऊर्जा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर सुरू आहे.

खासदार निलेश लंके यांनी म हाविकास आघाडीच्या कालखंडात सत्तेवर असताना टाकळी ढोकेश्वर येथिल सौरऊर्जा प्रकल्पाची उभारणी केली असून लंके यांच्या कामाचे फलित समजले जात आहे. दरम्यान, हा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होण्याच्या मार्गावर असल्याने आता टाकळी ढोकेश्वर येथिल ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्रात अंतर्गत टाकळी ढोकेश्वर गावासह सुमारे २१ गावांतील नागरिकांना व शेतकर्यांना दिवसा वीजेचा अखंडित पुरवठा होण्यास मदत होऊन लोडशेडींग कमी होण्यास म दत असल्याचेही सरपंच अरुणा खिलारी यांनी सांगितले.

कृषी वाहिन्यांना सौरऊर्जेद्वरे निर्माण केलेल्या विजेचा पुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारच्या पीएम कुसूम योजनेच्या आधारे राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना - २ राबविण्यात येत आहे. टाकळी ढोकेश्वर येथिल महाराष्ट्र शासनाच्या मालकीची ५० एकर ग्राम पंचायत हद्दीत गायराणावर उभारण्यात आलेल्या ९ मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पचे काम प्रगतीपथावर असून या योजनेमुळे स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीसही चालना मिळणार आहे. जागा देणाऱ्या टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतला हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून पीएम कुसूम योजनेच्या माध्यमातून एकरकमी वर्षाला पाच (५) लाख रुपये अनुदान मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना - २ अंतर्गत देण्यात येणार असून त्यासाठी ग्रामपंचायतने प्रस्ताव तयार करून देण्यात येणार असल्याचे खिलारी यांनी सांगितले. ही गायरान जमिन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांच्यासह प्रशासकीय टीमचे विशेष सहकार्य लाभले असल्याची माहिती सरपंच अरुणा खिलारी यांनी दिली.

**सरपंच अरुणा खिलारींच्या पाठपुराव्याला यश !**



“मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टाकळी ढोकेश्वर येथे ९ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प दिला आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ग्राम पंचायतला शासनाकडून दरवर्षी एकरकमी पाच लाख रुपये अनुदान मिळणार आहे. प्रकल्पासाठी रस्त्यावरची लढाई खिलारींनी शेतकर्यांच्या हितार्थ जिंकल्याचे दिसून आले आहे. विज निर्मिती करताना विजेची मागणी व विजेचा पुरवठा यात संतुलन साधता यावे म्हणून शेतकऱ्यांना अर्धा वेळ रात्रीच्या वेळी शेतीला पाणी देताना अनेकवेळा शेतकऱ्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागत असे. कधी वन्यप्राण्यांचा हल्ला कधी बिबट्या व सर्पदंश अशा असंख्य अडचणींमुळे मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून शेतकऱ्यांना विश्वासार्ह दिवसा वीज पुरवठा मिळावा, अशी मागणी अनेक दिवसांपासून होत असून आपल्या गावातील लोकांची ही मागणी पूर्ण करू शकत असल्यानचे समाधान आहे. लवकरच या प्रकल्पाचे टाकळी ढोकेश्वर परिसरातील शेतकऱ्यांच्या उपस्थित भव्य लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे.

**- अरुणा खिलारी, सरपंच, टाकळी ढोकेश्वर**

# ‘ग्लोबल पीस ऑनर’ कार्यक्रम उत्साहात संपन्न

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, मुंबई :** दहशतवादाविरुद्धचे युद्ध संपलेले नाही. या दहशतवादाच्या विरोधात लढण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजग आणि सतर्क असले पाहिजे. कान आणि डोळे बनून सुरक्षेचे काम केले पाहिजे असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. दिवीजा फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ग्लोबल पीस ऑनर कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे प्रमुख डॉ. सदानंद दाते, एनएसजी कम ांडो सुनिल जोधा, रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्ष नीता अंबानी यांचा ग्लोबल पीस ऑनर सन्मानाने गौरवण्यात आले.

२६/११ या काळजाला भिडणाऱ्या घटनेला १७ वर्षे झाली असली तरी त्या दिवसाची वेदना आजही आपणा सर्वांच्या मनात कायम असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईसह देशभरात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या हल्ल्यातील शहीदांना आदरांजली देण्यासाठी आणि हुतात्म्यांच्या स्मृती ताज्या ठेवण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे. पहलगाम येथे निष्पाप नागरिकांची हत्या करून दहशतवादी संघटना देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा घटनांवरून आजही दहशतवादाचा धोका कायम असल्याचे स्पष्ट



होत असून, प्रत्येक नागरिकाने सतर्क राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २६/१२ चा हल्ला हा ताज किंवा मुंबईपुरता मर्यादित नव्हता. जसा अमेरिका 'ट्विन टॉवर' हल्ला म्हणजे अमेरिकेच्या सार्वभौमत्वावरील हल्ला होता, तसाच २६/११ चा हल्ला हा संपूर्ण भारताच्या सार्वभौमत्वाला दिलेला मोठा धक्का होता. त्या काळात ठोस प्रतिउत्तर दिले असते तर कदाचित पुन्हा असा हल्ला झाला नसता. परंतु आता परिस्थिती बदलली असून भारत मजबूत, सक्षम आणि निर्णायक देश म्हणून जगासमोर उभा आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’द्वारे पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर कारवाई करत जगाला आपली क्षमता दाखवून दिली. भारत निर्णायक कारवाई करणारा देश आहे. आज देशाची सुरक्षा यंत्रणा अत्यंत मजबूत झाली आहे. दिल्ली बॉम्बस्फोटापूर्वी सुरक्षा यंत्रणांनी मोठ्या प्रमाणात स्फोटक पदार्थ आणि शस्त्रे जप्त करून मोठा कट उधळून लावला आहे.



दहशतवादी सरळ युद्ध करू शकत नाहीत म्हणून छुपे युद्ध सुरू आहे. अशा परिस्थितीत देशातील प्रत्येक नागरिकाने सतत जागरूक राहणे गरजेचे आहे. आजच्या दिवशी शहीद हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर, तुकाराम ओंबाळे, मेजर उन्नीकृष्णन आणि प्रकाश मोरे यांसह सर्व शूरवीरांना विनम्र अभिवादन करतो.

**मुंबईची संस्कृती खंबीर आहे; ती थांबत नाही, खचत नाही - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, २६/११ हल्ल्यात मुंबईची संस्कृती, तिचा आत्मा आणि तिची ओळख लक्ष्य करण्यात आली होती. पण मुंबई थांबली नाही आणि खचली नाही. आपण या हल्ल्याला ठाम प्रत्युत्तर दिले. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला दिलेले उत्तर हे देशाच्या बदललेल्या सामर्थ्याचे द्योतक आहे.

सदानंद दाते आणि नीता अंबानी यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी सांगितले की, अशा व्यक्तींचा देशाला अभिमान आहे. कार्यक्रमात २६/११ हल्ल्यात अतुलनीय धैर्य दाखवणारे वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि राष्ट्रीय तपास यंत्रणेचे प्रमुख डॉ. सदानंद दाते यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कामा रुग्णालयातील ग्रेनेड हल्ल्यात गंभीर जखमी असूनही त्यांनी मागे न हटता अतिरेक्यांचा सामना केला आणि त्यांचा शेवट केला.

शांतीदूत म्हणून काम करत असलेल्या आणि समाजामध्ये सकारात्मकता निर्माण करणाऱ्या रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्ष नीता अंबानी यांचा गौरव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच २६/११ हल्ल्यात अतुलनीय शौर्य दाखवणारे आणि ‘जिंदा शहीद’ म्हणून ओळखले जाणारे सुनिल जोधा यांनाही गौरवण्यात आले. जोधा यांनी या हल्ल्यावेळी शरीरावर २० गोळ्या झेलल्या ज्यातील एक आजही त्यांच्या शरीरात आहे. या कार्यक्रमामध्ये पहलगाम हल्ल्यात जीव गमावलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनाही सन्मानित करण्यात आले तसेच २६/११ या हल्ल्यातील शहिदांच्या कुटुंबीयांनाही सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास, नाविन्यता आणि रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मुकेश अंबानी, यांच्यासह बॉलिवूड मधील कलाकार आणि मान्यवर उपस्थित होते.

# संपादकीय

## संशयास्पद मतदार...

आसाममध्ये संशयास्पद मतदारांविरुद्ध सुमारे पाच दशकांपासून लढा सुरू आहे. सध्या आसाममध्ये असे ९६,९८७ मतदार आहेत. आसामच्या एकूण मतदारसंख्येच्या (सुमारे २.४ कोटी) ते प्रमाण ०.४ टक्के आहे. मात्र, हे प्रमाण राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे आहे, कारण हे लोक बहुतेक बंगाली-मुस्लिम समुदायातील आहेत. आसाम आंदोलन आणि त्यानंतरच्या घटनांचा आसामी समाजावर कायमचा परिणाम झाला आहे आणि बेकायदा स्थलांतराचा मुद्दा तणावाचा स्रोत राहिला आहे.

'ऑल आसाम स्टुडंट्स युनियन' (AASU) आणि आसाम गण परिषद या दोन संघटनांच्या नेतृत्वाखालील आसाम आंदोलन हे बांगलादेशातून येणाऱ्या बेकायदा स्थलांतराविरोधात होते. या स्थलांतरामुळे स्थानिक आसामी लोकांचे राजकीय आणि लोकसंख्याशास्त्रीय अधिकार कमकुवत होतील, अशी भीती या गटाला होती. त्यांचे लक्ष बांगलादेशातून येणाऱ्या स्थलांतरितांवर असले तरी, त्यांची बंगालीविरोधी भावना आसाममध्ये राहणाऱ्या भारतीय आणि बांगलादेशी बंगाली दोघांमध्येही पसरली. १९७९ ते १९८५पर्यंत चाललेली ही चळवळ आसामी राष्ट्रवादी इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग होती आणि अलीकडील राजकारणात अजूनही वादाचा मुद्दा आहे.

पुढे याच दोन संघटनांचं विलीनीकरण होऊन आसाम गण परिषद हा क्षेत्रीय पक्ष अस्तित्वात आला. प्रफुल्लकुमार महंत मुख्यमंत्री, तर भ्रुगुकुमार फुकन गृहमंत्री बनले. या पक्षाचे आसाममध्ये दहा वर्षे राज्य होते. ही चळवळ १९८५च्या आसाम करारानंतर संपली आणि बेकायदा स्थलांतराला तोंड देण्यासाठी परदेशी न्यायाधिकरणांची स्थापना झाली आणि राजकीय प्रक्रियेत 'आसू'चा समावेश करण्यात आला. १९८५ च्या आसाम करारानुसार, २४ मार्च १९७१ नंतर बेकायदा आलेल्या व्यक्तींना परदेशी मानले जाते. आसाममध्ये दाखल झालेल्या सर्व बेकायदा स्थलांतरितांना शोधून त्यांना हद्दपार करण्याची प्राथमिक मागणी होती.

बेकायदा स्थलांतर आणि आसामी लोकसंख्येवर त्याचे नकारात्मक परिणाम होत असल्याच्या चिंतेमुळे हे आंदोलन सुरू झाले होते, परंतु, या चळवळीची मुळे ब्रिटिश वसाहत काळापासून सुरू आहेत. तेव्हा बंगाली हिंदूंना ब्रह्मपुत्रा खोऱ्यात स्थलांतर करण्यास प्रोत्साहित केले जात होते. आजही आसाममध्ये बंगालीविरोधी भावना कायम आहे.

ऑगस्ट २०२५ मध्ये, 'आसू'ने बेकायदा हिंदू बांगलादेशींवरील खटले मागे घेण्याचा निषेध केला आणि 'सीएए'मधून आसामला वगळण्याची मागणी केली. नेमका इथेच भाजप आणि आसाम गणपरिषद तसेच 'आसू'च्या विचारासरणीत मूलभूत फरक आहे.

आसाममध्ये निवडणूक आयोगाने मतदारयादीची विशेष पडताळणी जाहीर केली आहे. ही प्रक्रिया २०२६ च्या आसाम विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू होत असून, ती सामान्य पडताळणीपेक्षा अधिक तपशीलवार आहे, पण विशेष सखोल पडताळणी (एसआयआर) इतकी कठोर नाही. यात घराघरात जाऊन तपासणी केली जाईल परंतु, नवीन नोंदणी, फॉर्म वाटप केले जाणार नाहीत; त्याऐवजी पूर्वी भरलेल्या नोंदींची खातरजमा केली जाईल.

**संशयित मतदारांशी संबंधित मुद्दे :**

आसाम ही एकमेव राज्य आहे जिथे 'डी-मतदार' ही श्रेणी आहे. (डी: डाऊटफुल) १९९७ मध्ये 'ईसीआय'ने जवळपास तीन लाख मतदारांना 'डी' चिन्ह दिले होते, कारण त्यांची नागरिकत्वाची कागदपत्रे संशयास्पद होती. सध्या आसाममध्ये ९६,९८७ डी-मतदार आहेत. त्यांनी परदेशी ट्रिब्युनल किंवा न्यायालयाच्या आदेशापर्यंत मतदानाचा अधिकार गमावलेला आहे. या मतदारांच्या नोंदी तशाच राहतील. त्यांची माहिती (नाव, वय, फोटो) ड्राफ्ट मतदारयादीत पुढे नेली जाईल, परंतु त्यांची घराघरात तपासणी होणार नाही. 'डी' चिन्ह काढणे, अपडेट करणे किंवा हटवणे हे ट्रिब्युनल किंवा न्यायालयाच्या आदेशाशिवाय शक्य नाही.

अंतिम मतदारयादी १० फेब्रुवारी २०२६ रोजी प्रकाशित केली जाईल. या प्रक्रियेत मृत, स्थलांतरित किंवा दुहेरी नोंदी असलेले मतदार १०० टक्के वगळले जातील. नवीन मतदारांसाठी फॉर्म ६ आणि दुरुस्तीसाठी फॉर्म ८ स्वीकारले जातील. आधार कार्ड ऐच्छिक आहे. या प्रक्रियेतून २०२६ च्या एप्रिल महिन्यातील आसाम विधानसभा निवडणुकांसाठी अंतिम मतदारयादी तयार होईल. संशयास्पद मतदार मतदानापासून वंचित राहतील.

## शॉर्टकट..

**प्रत्येकां आजकाल**
**प्रिय अति शॉर्टकट**
**प्रोसिजर अडचणी**
**नकोवाटते कटकट**

**भले कमी मिळू द्या**
**मिळो मात्र झटपट**
**ऐते मिळो सर्वोत्तम**
**ना करताचं खटपट**

**चिरीमिरी देऊ घेऊ**
**कामे व्हावी पटपट**
**रांगेमध्ये नको नको**
**पायकरतात लटपट**

**सोयरे सुतक नसते**
**होवो दुसरा चितपट**
**फ्लॉप व्हावे इतराने**
**हीटआमचा चित्रपट**

**यश लाभते इतरांना**
**चाले आदळ आपट**
**बोचतो त्याचाआनंद**
**मलाच तीळ तळपट**

**मनी अकारण कपट**
**चेष्टाचालतात मर्कट**
**आडवाट चिखलाची**
**अडकू शकतो शकट**

**धोका दायी शॉर्ट कट**
**अ वैध वाट मळ कट**
**घिसाड घाईचे नादात**
**चारित्र्य होई कळकट**

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# उत्तराखंडच्या जौनसर-बावर प्रदेशातील विवाह मॉडेल

सध्या लग्नसराई सुरु आहे. लग्न समारंभ म्हटलं कि दागदागिने, महागडे कपडे, उंची भेटवस्तू, विविध प्रकारचे शाकाहारी आणि मासांहारी खाण्याचे पदार्थ आणि त्यासोबत मद्याच्या मेजवान्या या गोष्टी ओघाओघाने येतातच. वाढत्या महागाईच्या काळातही राज्यासह देशाच्या अनेक भागांत लग्न समारंभ हा केवळ धार्मिक विधी राहिला नसून आपली श्रीमंती दाखवण्याचा आणि स्टेटस मिरवण्याचा भाग बनला आहे. लग्न समारंभाच्या निमित्ताने २-३ दिवसांत लाखो रुपयांची उधळण केली जाते.




अनेक जण केवळ रुबाब दाखवण्यासाठी मागे कर्जाचे डोंगर उभे करतात. या उंची बडेजावामुळे सामाजिक विषमतेला खतपाणी मिळते हे ओळखून उत्तराखंड मधील जौनसर-बावर प्रदेशात एक अनोखा निर्णय घेण्यात आला आहे ज्याची चर्चा आज देशभरात होत आहे. उत्तराखंड मधील जौनसर-बावर आणि भोवतालचा परिसर तेथील संस्कृती आणि परंपरा यासाठी प्रसिद्ध आहे. पांडवलीन कारभाराचे आणि न्यायव्यवस्थेचे या ठिकाणी आजही पालन केले जाते. एकत्रित कुटुंब पद्धती या ठिकाणी आजही पाहायला मिळते त्यामुळे इथे एका कुटुंबातील ४० ते ५० जण एकाच घरात गुण्यागोविंदाने नांदताना दिसतात. येथील खाट परंपरेशी संबंधित २५ गावांनी कोणाची आर्थिक क्षमता चांगली असली तरी विवाह समारंभ साधेपणानेच साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. लग्नात महागड्या वस्तू, फास्ट फूड आणि दारू यांवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. नियमाचे उल्लंघन करणाऱ्याला एक लाख रुपयांचा दंड ठोकण्याचा निर्णय एकत्रितपणे घेण्यात आला आहे. लग्न समारंभात महिलांना केवळ तिनच पारंपारिक दागिने घालण्याचा नियमही यांनी सर्वानुमते घेतलेला आहे. लग्न समारंभात दागिने खरेदी करण्यासाठी तसेच पाहुण्यांचा, नातेवाईकांचा आणि निमंत्रितांच्या मानपान राखण्यासाठी, त्यांना खाण्यापिण्याच्या मेजवान्या देण्यासाठी दोन्हीकडील यजमान कुटुंबीयांचा मोठ्या प्रमाणात व्यय होतो. त्यासाठी त्यांना प्रसंगी कर्जही काढावे लागते आणि ते फेडण्यात कुटुंबियांचे आर्थिक गणित बिघडते. या सर्व बडेजावामुळे समाजात गरीब-श्रीमंत यांतील दरी आणखीनच वाढते त्यामुळे उत्तराखंड मधील जौनसर-बावरच्या २५ गावातील मंडळींनी हा निर्णय एकत्रितपणे घेतला आहे. जौनसर-बावर प्रदेशातील खाट परंपरेच्या या निर्णयाचे आज सर्वत्र कौतुक केले जात आहे.

लग्न समारंभ खरेतर हिंदू परंपरेने सांगितलेल्या सोळा संस्कारांपैकी एक महत्वाचा संस्कार आहे. लग्न समारंभ हा धार्मिक विधी असल्याने त्यातील धार्मिक विधींना सर्वाधिक महत्व द्यायला हवे. मात्र हल्लीचे विवाह सोहळे पाहिले कि धार्मिक विधींना डावलून बाकीच्या अवडंबरालाच अधिक महत्व दिले जात असल्याचे पाहायला मिळते. स्वागत समारंभासाठी वधूवरांच्या कपड्यांवर हजारो रुपये खर्च केले जातात.

स्वागत समारंभासाठी घातलेले कपडे वधूवरांकडून पुढील आयुष्यात कधी घातलेही जात नाहीत. विवाह समारंभाला मनोरंजक करण्यासाठी इव्हेन्ट मॅनेजमेन्ट करणाऱ्या कंपन्यांना लाखो रुपयांचे कॉन्ट्रॅक्ट दिले जाते. वरातीसाठी बेण्डबाजासह कानठळ्या बसवणारे आणि अनेक घातक आजारांना निमंत्रण देणारे डीजे वाजवले जातात. पाहुण्यांना खुश करण्यासाठी जेवणात नको तेव्हढे पदार्थ वाढले जातात ज्यामध्ये कितीतरी अन्न वाया जाते. तहान भागवण्यासाठी मिनरल वॉटरच्या बाटल्या वाटल्या जातात ज्या पाणी पिऊन झाल्यावर लग्न मंडपांत इतस्ततः फेकल्या जातात. हळदीच्या निमित्ताने मटणाच्या आणि मद्याच्या मेजवान्या दिल्या जातात. लग्न सोहळ्यासाठी खरेतर आपल्या ऐपतीप्रमाणेच खर्च केला जावा; मात्र समाजात स्टेटस राखण्यासाठी वर-वधूच्या कुटुंबियांकडून लग्न सोहळा दिमाखात पार पडावा यासाठी कर्ज काढून वारेमाप खर्च केला जातो. त्यामुळे विवाह संस्कारातील धार्मिक विधी राहतात बाजूला आणि अनावश्यक बाबींसाठी पाण्यासारखा पैसा व्यय केला जातो.

लग्नानंतर गृहस्थाश्रम आरंभ होतो. नवा संसार उभा करण्यासाठी जागोजागी धनाची निकड भासते; मात्र वधु-वरांची सुरुवातीची काही वर्षे लग्नासाठी काढलेल्या कर्जाचे हप्ते फेडण्यातच व्यय होतात. लोकांना, नातेवाईकांना काय वाटेल या विचाराने आपण कर्जबाजारी होऊन लग्न सोहळे साजरे करत असू तर हेच लोक नंतरही आपल्याला नावे ठेवणारच आहेत हे लक्षात घ्यायला हवे. लग्न समारंभाच्या निमित्ताने होणारी पैशांची उधळण रोखण्यासाठी जौनसर-बावर प्रदेशातील खाट परंपरेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी सर्वच गावांतून आणि शहरांतून करण्याची गरज आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

# गुलाबी चाकांवर आत्मनिर्भरतेचा प्रवास...

## कोल्हापुरात 'गुलाबी रिक्षा' योजनेतून महिलांना नवसंजीवनी...!!

महिलांच्या सुरक्षेसाठी शासनाने गुलाबी रिक्षाची संकल्पना पुढे आणली आहे. महिलांनी रिक्षाचालक होऊन महिलांच्या सुरक्षेचे कवच व्हावे, असा त्याचा मुख्य उद्देश. कोल्हापुरात योजनेचा मोठा गाजावाजा झाला.

महासैनिक दरबार हॉलमध्ये कार्यक्रमात महिलांना रिक्षाचे वाटप झाले आणि त्यांच्या स्वकमाईच्या चाकांनी गती घेतली. या रिक्षाचालक महिलांच्या दैनंदिन आयुष्याचे पदर समजून घेण्यासाठी त्यांना भेटण्याचे निश्चित केले. मोबाईलवर संपर्क साधून त्यांच्याशी संवाद साधला आणि तडक त्या ज्या मार्गावर प्रवासी वाहतूक करतात, तेथे त्यांना जाऊन भेटलो.तुम्ही आता कुठे आहात...? या प्रश्नावर 'छत्रपती शिवाजी महाराज चौकात आहे. एक सीट मिळाली की कदमवाडीकडे येणार आहे असे गुलाबी रिक्षाचालक मनोरमा सचिन पोवार यांचे उत्तर. दाभोळकर कॉर्नरकडे मी येत आहे. तेथेच भेटू त्यावर त्या 'ओके' म्हणाल्या. दाभोळकर कॉर्नरवरील बस स्थानकाच्या पुढे थांबलो. चौकातून येणाऱ्या गुलाबी रिक्षावर लगेच नजर पडली. चालकाच्या सीटवर स्वतः मनोरमा पोवार व त्यांचा चार वर्षांचा मुलगा, असे दृश्य दिसले. सीटवरुन तो पडू नये, याची दक्षता म्हणून मुलग्याच्या कमरेला एका कापडी दोरीने बांधलेले होते. रिक्षात महिला व एक पुरुष प्रवासी बसलेले होते.

मनोरमा यांच्या चेहऱ्यावर कामाचा ताण दिसत नव्हता. हसतमुखाने त्या संवाद साधू लागल्या.मी सदर बाजारातील प्रकाश विद्यामंदिरजवळ राहते. नवऱ्याकडे पूर्वी शंभर-दोनशे रुपये मागायला लागायचे. आता रोज किमान ४०० ते ९०० रुपयांपर्यंत कमाई होते. सकाळी अकराला घरातून बाहेर पडते आणि प्रवासी वाहतुकीला सुरुवात करते. घरी आम्ही तियेच आहोत. नवरा सचिन पोवार ट्रॅव्हल्सच्या बुकिंगचे काम करतात. घरी अन्य कोणी नसल्याने मुलग्याला सोबत घ्यावे लागते. त्याच्या शिक्षणाचा व घरवा खर्च लक्षात घेऊन मी व्यवसायात उतरले आहे, मनोरमा सांगत होत्या. 'तुमचे शिक्षण किती झाले?' यावर मी नववीपर्यंत शिकले आहे. अन्य काम करायचे म्हटले तर मुलग्याला घेऊन ते करणे शक्य नव्हते. जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्राच्या समन्वयक नीलम धनवडे यांनी गुलाबी रिक्षाचालक होण्याचा सल्ला दिला. रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षणही दिले.गुलाबी रिक्षासाठी अर्ज केला आणि योजनेसाठी मी पात्र ठरले, रिक्षाचा परवाना मिळाल्यानंतर दसऱ्या दिवशी प्रवासी वाहतुकीला सुरुवात केली.आज स्वतःच्या पायावर उभीआहे.

**•त्यांच्या' ही संसाराला आधार...**

कोल्हापूर शिवाजी पेठेतील प्रणाली संतोष आमते याही गुलाबी रिक्षाच्या लाभार्थी. दसऱ्या दिवशी परवाना मिळाल्यानंतर रिक्षातून देवदर्शन केले. अजून प्रवासी वाहतुकीला सुरुवात केलेली नाही. कारण रिक्षावे हँडल लॉक झाल्याने दुरुस्तीसाठी गॅरेजमध्ये दिली आहे,' अशी माहिती त्यांच्याकडून मिळाली. 'पेठेतील एका खासगी रुग्णालयात काम करते. रिक्षाच्या माध्यमातून संसाराला आधार मिळाला आहे, असे त्यांचे उत्तर होते. शिंगणापुरातील राजश्री संदीप पाटील यांचे किराणा मालाचे दुकान, दुकानातील माल आणण्यासाठी अन्य वाहन त्यांना वापरायला लागायचे. हा व्यवसाय सांभाळत रिक्षाचालक म्हणून काम केले तर त्याचा दुहेरी फायदा होईल, हे त्यांच्या लक्षात आले. तत्काळ त्यांनी गुलाबी रिक्षासाठी अर्ज केला. वडील स्वतः रिक्षाचालक असल्याने त्यांच्याकडून प्रशिक्षण घेतले. आता त्या इंग्रजी माध्यमांत शिकणाऱ्या मुलांना शाळेत सोडण्याचे व आणण्याचे काम करत आहेत.

आकाश भिकाजी कोतेकर यांचे विशष सहकार्य यांच्या कुटुंबला वेळोवेळी लाभते.

**•मनोगत...**


सुहास वाईगडे- जिल्हा महिला बालविकास अधिकारी कोल्हापूर.

जिल्ह्यात ६०० लाभार्थ्यांना गुलाबी रिक्षा रिक्षांचे वाटप करायचे आहे. ६६ त्यासाठी एकूण अर्ज ७१६ आले होते. त्यापैकी ३४२ परिपूर्ण होते. या परिपूर्ण अर्जातील केवळ बारा महिलांनी रिक्षा चालक होण्यासाठी पसंती दर्शवली. तीन महिलांना रिक्षांचे परवाने प्रादेशिक परिवहन कार्यालयातून देण्यात आहे आहेत. अन्य महिलांना परवाने दिल्यानंतर त्याही प्रवासी वाहतूक सुरू करतील. ग्रामीण भागात पुढील आठवड्यात शिबिरे घेऊन महिलांना योजनेचे लाभार्थी होण्यासाठी आवाहन करण्यात येईल.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर ९८६७७३२५०४**

# शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि सामाजिक वास्तव

आज संपूर्ण समाजाला हादरवून सोडणारी आणि मानवी संवेदनांना प्रश्न विचारणारी सर्वात गंभीर घटना म्हणजे शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्या. शाळेतील मुलांच्या हातात पेन, वही, स्वप्नं आणि भविष्य असावं; पण त्यांच्या हातात दोरी, ब्लेड किंवा आत्महत्येचे मार्ग येऊ लागले, ही केवळ व्यक्तिगत समस्या राहिलेली नाही, तर ती आपल्या शिक्षण पद्धतीचा, कुटुंबीय संस्कारांचा, डिजिटल युगातील स्पर्धेचा आणि समाजाच्या यंत्रणेचा परिणाम आहे. अलीकडे घडलेल्या अनेक आत्महत्यांच्या घटना, विशेषतः दिल्ली, पुणे, कोटा, वर्धा आणि इतर भागातील विद्यार्थ्यांच्या मृत्यूने संपूर्ण समाजाच्या मनावर प्रश्न निर्माण केला आहे की अखेर एवढं काय घडलं की एक निष्पाप विद्यार्थी स्वतःचं जीवन संपवण्याचा निर्णय घेतो? समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास विद्यार्थी आत्महत्या ही वैयक्तिक कमजोरी नसून सामाजिक दाब, सांस्कृतिक अपेक्षा, कौटुंबिक वातावरण, शालेय मूल्यांकन पद्धती आणि मानसिक आरोग्याविषयी असलेल्या अज्ञानाची संयुक्त निर्मिती आहे.



आजच्या कुटुंब रचनांमध्ये मुलांची संख्या कमी झाल्याने एकुलता एक किंवा लाडका-लाडकी संस्कृती वाढली आहे. पालकांच्या नजरेत मुलं आता 'निर्माण करायचे चारित्र्य' नसून 'गुंतवणुकीवर मिळणारा परतावा' झाली आहेत. जेथे पालक स्वतःच्या अपूर्ण आकांक्षा, सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक स्पर्धा मुलांच्या शिक्षणावर लादतात. त्यामुळे मुलांवर अपेक्षांचे ओझे वाढते. अनेक मुलांमध्ये ताण सहन करण्याची कौशल्ये विकसितच होत नाहीत. पूर्वीच्या संयुक्त कुटुंबात भावंडे, आजी-आजोबा, खेळ, शिक्षा, शिस्त आणि संवाद होते; आज मात्र घरात शांतता आहे पण मनांत आवाज आहेत, मोबाईल आहे पण संवाद नाही, महागडी शाळा आहेत पण भावनिक शिक्षण नाही. शिक्षा किंवा मर्यादा लावणे आता 'मानसिक हिंसा' समजली जाते आणि मुलांना अपयश किंवा नकार स्वीकारण्याची मानसिक सवयच राहत नाही.

अलीकडच्या काळात शालेय विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनकपणे वाढताना दिसत आहे. शाळा म्हणजे ज्ञान, शिस्त, समविचारांची देवाणघेवाण आणि भविष्याचे घडते पाऊल असे आपण मानतो; परंतु जेव्हा हीच शाळा, हा शैक्षणिक प्रवास विद्यार्थ्यांसाठी जिवाभावाचा भार बनतो, तेव्हा समाजाची मूल्यव्यवस्था किती बदलली आहे हे प्रकर्षाने जाणवते. आत्महत्या ही केवळ वैयक्तिक निर्णय नसतो; तो एक सामाजिक संदेश असतो की कुठेतरी काही चुकले आहे, आणि गंभीरपणे चुकत आहे. शालेय वयातील विद्यार्थ्यांनी आत्महत्या करणे हे सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक आणि मानसिक आरोग्याच्या घटकांचे गुंतागुंतीचे मिश्रण आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून ही समस्या पाहिली तर या घटना केवळ काही दुःखद किस्से नाहीत, तर वाढत्या सामाजिक दडपणाचे प्रतिबिंब आहेत.

आजचा विद्यार्थी कट्टर स्पर्धेच्या जगात जगत आहे. शाळा म्हणजे फक्त वर्ग, पुस्तके आणि परीक्षा नव्हे; ती स्पर्धेची रणभूमी झाली आहे जिथे पहिले येणारेच यशस्वी मानले जातात, बाकी सर्व हरलेले ठरविले जातात. विद्यार्थ्यांच्या भावनिक जगण्यापेक्षा त्यांच्या गुणपत्रिकेला अधिक प्रतिष्ठा दिली जाऊ लागली आहे. शिक्षकांची अपेक्षा, पालकांचे स्वप्न आणि समाजाचे मूल्यांकन या तिपेडी दडपणाखाली विद्यार्थी स्वतःचा वेगळा आवाज हरवून बसतात. मानसिक आरोग्याला अजूनही नाजूकपणा समजले जाते आणि मुलांवर होणारा भावनिक ताण अदृश्य राहतो. अशा परिस्थितीत जेव्हा विद्यार्थी मोठ्या भावनिक आव्हानांशी झुंजतात, तेव्हा त्यांना आधार, संवाद किंवा समजून घेणारा हात मिळत नाही आणि ते मौनात तुटू लागतात.

कुटुंबव्यवस्था या समस्येत निर्णायक भूमिका बजावते. अणुकुटुंबामुळे संवाद आणि भावनिक सहजीवन कमी झाले आहे. पालकांच्या नोकऱ्या, व्यस्त दिनक्रम आणि तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेले दैनंदिन जीवन मुलांशी असणाऱ्या संवादाला बाधित करत आहे. अनेकवेळा मुलांचे मी ठीक नाही, मला भीती वाटते, मला जमत नाही हे संकेत पालकांच्या लक्षातही येत नाहीत. दुसरीकडे एकुलता एक किंवा कमी अपत्य असलेल्या कुटुंबांमध्ये मुलांवर अतिप्रेम, अतीसंरक्षण आणि त्याचबरोबर अवास्तव अपेक्षा यांचे अनोखे मिश्रण तयार झाले आहे. परिणामी, मुलांनी चुका करणे किंवा अपयश स्वीकारणे अशक्य झाले आहे. तू कसं नाही करू शकत?, इतर मुलं करू शकतात मग तू का नाही? या प्रश्नांपेक्षा त्यांना हवं असतं ते तुला काय त्रास होतोय? मी आहे ना.

शाळांनी मुलांना फक्त ज्ञान देऊन चालणार नाही; त्यांना भावनिक स्थैर्य, ताणतणावांचं व्यवस्थापन, आत्मस्वीकृती आणि जीवनकौशल्ये शिकवणे अधिक आवश्यक आहे. परंतु शिक्षण पद्धतीत परीक्षांच्या, रँकिंगच्या आणि कामगिरीच्या आकड्यांना अधिक महत्त्व देण्यात येते. इथे विद्यार्थ्यांचे मानसिक जग समजून घेणारी, त्यांची भीती कमी करणारी आणि त्यांना मानवी मूल्ये शिकवणारी प्रणाली अद्याप रुजली नाही. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील नातेसंबंधही यांत्रिक झाले आहेत ते म्हणजे नाव, चेहरा आणि रोल नंबर एवढ्यापुरतेच. शालेय परिसरातील छळवाद, टोमणे, अपमान आणि शिक्षकांकडून होणारा ताण व ओरडणी हे अनेक विद्यार्थ्यांसाठी असह्य वास्तव बनते.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून जर या घटनांचा विचार केला, तर एमिल दुर्खाइमच्या 'अनोळखी आत्महत्या' (अपोळल डीॅळलळवश) या संकल्पनेशी त्यांची तुलना करता येते. जेव्हा समाजातील मूल्यव्यवस्थेत अचानक बदल होतात आणि व्यक्तीला त्यांच्याशी जुळवून घेता येत नाही, तेव्हा आत्महत्येचे प्रमाण वाढते. आजचा समाज यश, पैसा, स्पर्धा आणि प्रतिष्ठा या चार स्तंभांवर उभा आहे, जिथे करुणा, संवाद, शांतता, संवेदनशीलता आणि स्वीकार यांना कमी जागा मिळते. सोशल मीडियामुळे तुलना, अपूर्णतेची भावना, लोकप्रियता आणि इतरांसारखे होण्याची जबरदस्त इच्छा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर परिणाम करत आहे. तंत्रज्ञानाने जग जवळ आणले पण हृदये दूर नेली आहेत.

ही परिस्थिती बदलण्यासाठी कुटुंब, शाळा, समाज आणि शासन यांना एकत्रित प्रयत्न करावे लागतील. विद्यार्थ्यांना आत्महत्या हा मार्ग नसून त्यांच्यासाठी मदत उपलब्ध आहे, अशी जाणीव निर्माण होणे अत्यावश्यक आहे. शाळांमध्ये काउन्सेलिंग केंद्रे, मानसिक आरोग्य तज्ञ, हेल्पलाईन, ओपन कन्वर्सेशन तास, सहानुभूतीवर आधारित शिक्षण आणि ताण व्यवस्थापनाचे प्रशिक्षण असणे आवश्यक आहे. पालकांना मुलांशी भावनिक नातेसंबंध बांधण्याचे प्रशिक्षण देणे तितकेच महत्त्वाचे आहे. समाजाने गुणांवर आधारित मुलांचे मूल्यांकन करणे थांबवून त्यांची मूल्ये, आवडी, कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व ओळखण्याची गरज आहे.

शेवटी, प्रत्येक बालक हे अपूर्ण, वाढणारे, शिकणारे आणि चुका करणारे अस्तित्व आहे, विद्यार्थी हे प्रकल्प नसतात, ते जगणारे जीव असतात. आत्महत्येने संपणारी मुलांची स्वप्ने ही केवळ त्या मुलाची हानी नसून संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेचा मृत्यू आहे. आज आपण मुलांना शिकवतो कसे जिंकायचे, स्पर्धा कशी करायची, पण जीवन जगायचे कसे हे शिकवायला आपण विसरलो आहोत. जोपर्यंत हा विसर दूर होत नाही, तोपर्यंत या घटनांची सावली आपल्या भविष्यातील पिढीवर अंधार बनून राहील. कारण प्रश्न अजूनही तोच आहे की विद्यार्थी अभ्यासासाठी दबावाखाली आहेत की जगण्यासाठी?

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२**

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

# अक्षराज बातमीचा इम्पॅक्ट

## भारतीय जनता पार्टीच्या कचरा फेको आंदोलनानंतर प्रशासनाला आली जाग

### ठाणे घनकचरा उपआयुक्त यांची पाटील यांनी घेतली भेट; सकारात्मक चर्चा



दैनिक संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

मुख्य संपादक : विनोद गोरे मोबा.८६०५३१३२०२

रस्त्यावरचा कचरा उचलून घनकचरा विभागाच्या कार्यालयात टाकून आंदोलन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, दिवा (ठाणे) :** दिवा विभागात गेल्या ८ ते १० दिवसांपासून कचरा उचलण्याचे काम ठप्प असल्यामुळे संपूर्ण परिसरात कचऱ्याचे प्रचंड ढीग साचले आहेत. परिणामी रस्त्यांवरून जाणेही नागरिकांसाठी अत्यंत किळसवाणे झाले असून दुर्गंधीमुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासनाच्या घनकचरा विभागाकडून जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसत आहे.

या निष्काळजी प्रशासनाचा निषेध म्हणून दिनांक २०.११.२०२५ रोजी दुपारी १:०० वाजता भारतीय जनता पार्टी ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष विजय अनंत भोईर, दिवा–शील मंडळ अध्यक्ष सचिन रमेश भोईर, महिला मोर्चा अध्यक्षा सपना भगत, रोशन भगत, प्रवीण पाटील, नितीन कोरगावकर, साधना सिंह, पुनम सिंह, अनुराग पाटील, विजय वाघ, कल्पेश सारस्वत, तसेच भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मिळून दिवा विभागातील कचरा स्वतः गोळा करून तो थेट घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कार्यालयासमोर टाकून तीव्र निदर्शने केली.

पालिका प्रशासनाने तात्काळ कचरा उचलण्याची कार्यवाही सुरू न केल्यास अधिक आक्रमक आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

Main Edition - 21 Nov 2025 - Page 1
Powered By Aksharaj Media




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२३, दिवा (ठाणे) :** आजपासून घंटा गाडी पूर्ववत रुजू झाली आहे. परंतु परत कचऱ्याची समस्या पुन्हा उद्भवल्यास सहाय्यक आयुक्तांच्या दालनात कचरा टाकण्यात येईल. याची प्रशासनाने नोंद घ्यावी. असा इशारा भाजप दिवा–शिळ मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी दिला आहे. तसेच काल भाजपा शिळ –दिवा युवा मोर्चा अध्यक्ष, ठाणे शहर जिल्हा अभियंता अध्यक्ष प्रकोष्ट साहिल पाटील यांनी घनकचरा विभाग उप आयुक्त यांची भेट घेतली. आणि सकारात्मक चर्चा केली. लवकरच घंटागाडी सुरू करण्यात येईल आणि दिव्यातील कचरा हा उचलण्यात येईल असे आश्वासन दिले. असे साहिल पाटील यांनी सांगितले.डायघर डम्पिंग ठिकाणाबाबत नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहील अशा सुधारित व्यवस्थेचे नियोजन करावे. शिळ,खार्डी,पडले, खिडकाळी, देसाई, कल्याण फाटा, भोलेनाथ नगर, शिळ ठाकूरपाडा परिसरातील कचरा संकलन तातडीने नियमित सुरू करण्यात यावे. असे निवेदनात लेखि स्वरूपात लिहून ठाणे घनकचरा विभाग उप आयुक्त यांना साहिल पाटील यांनी दिला आहे.

दिवा विभागात गेल्या १० ते १२ दिवसांपासून कचरा उचलण्याचे काम ठप्प असल्यामुळे संपूर्ण परिसरात कचऱ्याचे प्रचंड ढीग साचले होते. परिणामी रस्त्यांवरून जाणेही नागरिकांसाठी अत्यंत किळसवाणे झाले होते. दुर्गंधीमुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता.

नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासनाच्या घनकचरा विभागाकडून जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात होते.या निष्काळजी प्रशासनाचा निषेध म्हणून दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १:०० वाजता भारतीय जनता पार्टी ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष विजय अनंत भोईर, दिवा–शील मंडळ अध्यक्ष सचिन रमेश भोईर, महिला मोर्चा अध्यक्षा सपना भगत, रोशन भगत, प्रवीण पाटील, नितीन कोरगावकर, साधना सिंह, पुनम सिंह, अनुराग पाटील, विजय वाघ, कल्पेश सारस्वत, तसेच भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मिळून दिवा विभागातील कचरा स्वतः गोळा करून तो थेट घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कार्यालयात टाकून तीव्र निदर्शने केली होती.

पालिका प्रशासनाने तात्काळ कचरा उचलण्याची कार्यवाही सुरू न केल्यास अधिक आक्रमक आंदोलन छेडण्याचा इशारा दिवा भाजपा शिष्टमंडळाकडून देण्यात आला होता. भारतीय जनता पार्टीच्या कचरा फेको आंदोलना नंतर दोन दिवसातच प्रशासनाला जाग आली. आज पासून घंटागाडी पूर्वत रुजू झाली आहे. आणि कचरा उचलण्याचे काम सुरू झाले आहे. घंटागाडी आणि कचरा उचलण्याचे काम सुरू झाल्यामुळे नागरिकांना आता दिलासा मिळाला आहे. भारतीय जनता पार्टीचे दिव्यातील नागरिकांनी आभार मानले आहेत.

## हिल लाईन पोलिसांची मोठी कामगिरी; कुख्यात आरोपी 'बाबू गायकवाड' अखेर पोलिस जाळ्यात

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२३, उल्हासनगर (ठाणे) :** हिल लाईन पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्हा रजि. क्रमांक २६२/२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, ११५(२), ३५२, ३(५) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१), १३५ अंतर्गत नोंदवलेल्या गंभीर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी अक्षय सुरेश गायकवाड उर्फ बाबू (वय ३५ वर्षे) याला पोलिसांनी आज शिताफीने ताब्यात घेतले.



दि.१८ एप्रिल २०२५ रोजी दाखल झालेल्या या गुन्ह्यापासून आरोपी बाबू गायकवाड हा ओळख लपवून फरार होता. त्याच्या हालचालींबाबत मिळालेल्या गुप्त माहितीनुसार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे सापळा रचून हिल लाईन पोलिसांनी त्याला त्याच्या रहाते घरातून अटक केली.

**आरोपीवर विविध पोलीस ठाण्यांमध्ये तब्बल २३ गुन्हे दाखल :-**

हिल लाईन पोलीस स्टेशन

गु. र. क्र. ४८/२०१० – भा. दं. सं. ३२४, ३४

गु. र. क्र. १६२/२०१० – भा. दं. सं. ३०७, ५०७, ३४

गु. र. क्र. २४८/२०१० – भा. दं. सं. ३५३, ५०६ सह महाराष्ट्र पोलीस कायदा ३७(१),१३५

गु. र. क्र. ३६२/२०१० – भा. दं. सं. ३४१, ५०६(२), ५०४

गु. र. क्र. २०२/२०१० – भा. दं. सं. ३२६, ३४

गु. र. क्र. ३६५/२०१० – भा. दं. सं. ३८५, ४५२, ४२७, ५०४, ५०६, ३४

गु. र. क्र. १९६/२०२० – भा. दं. सं. ३९४, ५०४, ५०६, ३४

**शिवाजीनगर पोलीस स्टेशन**

गु. र. क्र. ०३/२०१२ – भा. दं. सं. ३२४

गु. र. क्र. ०९/२०१२ – भा. दं. सं. ३०२, १२०(इ), ३४

गु. र. क्र. १५८/२०१५ – भा. दं. सं. ३९२, ३२३, ५०४, ५०६, ३४

गु. र. क्र. १४९/२०१७ – भा. दं. सं. ३८७, ३२३, ५०४

गु. र. क्र. १६८/२०१७ – भा. दं. सं. ३९४, ३४

गु. र. क्र. १६७/२०२० – भा. दं. सं. ३२६, ३२४, ३२३, ५०६, १४३, १४७, १४८, १४९

गु. र. क्र. १७८/२०२३ – भा. दं. सं. ३९४, ३८५, ३४

गु. र. क्र. १७९/२०२३ – भा. दं. सं. ४, २५

**विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन**

गु. र. क्र. १६३/२०१९ – भा. दं. सं. १४३, १४७, १४९, ३२४, ४२७

गु. र. क्र. १२०/२०१३ – भा. दं. सं. १४७,१४८,१४९,३५३,३३२

गु. र. क्र. १६७/२०२० – भा. दं. सं. ,३२४,५०६,१४७,१४८,१४९

**मध्यवर्ती पोलीस स्टेशन**

गु. र. क्र. ४१६/२०२४ – भा. दं. सं. ३९२, ३४

**उल्हासनगर पोलीस स्टेशन**

गु. र. क्र. ५/२०१५ – महाराष्ट्र पोलीस कायदा १४२

गु. र. क्र. २५६/२०२३ – भा. दं. सं. ३९४, ३२३, ३४

**कोळसेवाडी पोलीस स्टेशन**

गु. र. क्र. ६७९/२०१९ – भा. दं. सं. ३२६, १४३, १४७, १४८, १४९

**लोणावळा पोलीस स्टेशन**

गु. र. क्र. १८/२०१६ – भा. दं. सं. ३०७, ३६३, ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३४

एम.पी.डी.ए. (शिवाजीनगर पोलीस स्टेशन) प्रकरणही दाखल

कारवाईत सहभागी पथक

सदर ऑपरेशन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

नेतृत्व :

संदीप शिवले (व. पो. नि.)

सिद्धेश्वर कैलासे (पो. नि. – क्राईम)

**कारवाई करणारे अधिकारी :**

सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय सानप, पोलीस उपनिरीक्षक, संग्राम मालकर, अंकुश सुरेवाड, अविनाश सुर्वे हिल लाईन पोलीस स्टेशन तपास पथक.

हिल लाईन पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे परिसरात गुन्हेगारीवर मोठा आळा बसणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## ✻ जाहीर नोटीस ✻

बेलापुर येथील मे. दिवाणी न्यायाधीश क स्तर साहेब यांचे कोर्टात

चौ. अर्ज क्र. ५८/२०२४

**M.A. No. 192/ 2020**

**१. प्रतिक काशिनाथ पाटील, वय ३० वर्षे, व्यवसाय– नोकरी**
**राहणार घर नं. १६७१ श्री समर्थ कृपा जुईपाडा सेक्टर २३ जुईनगर, नवी मुंबई ४०००५**

**२. प्रगती कनकेश्वर पोपेटा वय वर्षे, व्यवसाय– गृहिणी**
**राहणार घर नं. ५५ कळंबोळी, गांव पो. कळंबोळी ता. पनवेल जि. रायगड महाराष्ट्र.** ......अर्जदार

**विरूद्ध**

**कोणीही नाही**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की मयत कै. काशिनाथ दशरथ पाटील हे दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी जुईपाडागांव सेक्टर २३, जुईनगर, नवी मुंबई ठाणे महाराष्ट्र ४००७०५ येथे मयत झालेले आहेत. वरील अर्जदार क्र. १ व २ यांनी कै. काशिनाथ दशरथ पाटील यांच्या खालील घर नं. १६७१ श्री समर्थ कृपा जुईपाडा सेक्टर २३ जुईनगर नवी मुंबई ४००७०५ संदर्भात वारस दाखला मिळणे बाबत या मे. न्यायालयाकडे अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मिळकतीचे वर्णन नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील घर नं. १६७१ श्री समर्थ कृपा जुईपाडा सेक्टर २३, जुईनगर नवी मुंबई ४००७०५ क्षेत्रफळ ३१.८० चौ. फुट असुन सदरहु घराची किंमत रू. ४८३०.०० या मिळकती वावतचा वारस दाखला मिळावा यासाठी अर्जदारांनी सदरचा अर्ज सादर केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास वाटत असेल तर या जाहीरनाम्याचे तारखे पासून ३० दिवसांचे आत त्याने तशी लेखी हरकत हया न्यायालयात हजर होऊन दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहु न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्का बाबत लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत त्यांचे मिळकतीचे वारस म्हणुन दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

**आज दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.**


शिक्का

**स्वाक्षरी**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर वाशी**

## गंगाधर डांगे यांनी दिला भाजपा शक्ती केंद्रप्रमुखाचा राजीनामा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२३, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड येथील नगरपरिषद निवडणुकीत सर्व साधारण जागेवर इतरांना उमेदवारी देऊन मराठा समाजाला वगळण्यात आल्यामुळे मुदखेड येथील भाजपाचे शक्ती केंद्रप्रमुख गंगाधर डांगे यांनी राजीनामा संबंधिताकडे दिले असल्याचे पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. गंगाधर डांगे यांनी त्यांच्या कृष्णकुंज निवासस्थानी आज दुपारी दोन वाजता पत्रकार परिषद बोलावली होती. यावेळी ते बोलताना म्हणाले की, मी गेल्या २५ वर्षापासून खासदार अशोकराव चव्हाण यांचा कार्यकर्ता असून माझे वडील सुद्धा कै.शंकरराव चव्हाण चे कार्यकर्तेच होते मी या निवडणुकीत अध्यक्ष पदासाठी माझ्या पत्नीचा अर्ज दाखल केला होता तेव्हा खा.अशोक चव्हाण यांनी मला नगरसेवक



पदासाठी अर्ज दाखल करा असं सांगितल्यावरून मी नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केला होता. परंतु मला त्यांनी उमेदवारी दिली नाही मागील काळात मराठा समाजाचे तीन नगरसेवक होते. परंतु यावेळी अशोक चव्हाण यांनी नगराध्यक्ष देऊन मराठा समाजाची एकावरच बोळवण केली खरं तर सर्वसाधारणला उमेदवारी मिळाली पाहिजे होती. पण त्यांनी इतर लोकांना ज्यांनी पक्षाचे काहीच काम केले नाही त्यांना उमेदवारी देऊन मराठा समाजाला नगरसेवक पदापासून वंचित ठेवले असा आरोप गंगाधर डांगे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला.

## सत्यजितसिंह पाटणकर यांच्या मागणीवरून पहिल्याच टप्प्यात ५ कोटी २० लाख मंजूर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२३, पाटण (सातारा) :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे, जिल्हाध्यक्ष व आमदार अतुलबाबा भोसले यांच्या माध्यमातून ग्रामविकास खात्यातून भाजपाचे राज्य परिषद सदस्य आणि सातारा जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर यांच्या मागणीवरून पाटण तालुक्यात पहिल्याच टप्प्यात ५ कोटी २० लाख रुपयांच्या विकासकामांना मंजुरी मिळाली आहे.

तर उर्वरीत विकासकामांनाही लवकरच टप्प्याटप्प्याने मंजुरी मिळेल, अशी माहिती पाटण येथील भारतीय जनता पार्टीच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली.

यामध्ये बांधवट येथे भैरवनाथ मंदिराजवळ संरक्षक भिंत बांधणे ५ लक्ष, आंबेवाडी येथील सार्वजनिक आड (विहीर) येथे संरक्षक भिंत बांधणे ५ लक्ष, मालोशी अंतर्गत घाटेवाडी येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, मुरूड अंतर्गत देवाचा माळ येथील रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे १० लक्ष, बांबवडे येथे स्मशानभूमी शेड बांधणे ५ लक्ष, भुडकेवाडी वरची येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, नुने येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष,



कडवे बु येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, कॅजळवाडी येथे लाईटचे नवीन १० पोल बसविणे ५ लक्ष, ढेबेवाडी येथील अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व गटर्स बांधणे १० लक्ष, मालदन येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व गटर्स बांधणे १० लक्ष, बनपुरी अंतर्गत विठ्ठल नगर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, सोनाईचीवाडी अंतर्गत खिलारवाडी खालची येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व गटर्स बांधणे १० लक्ष, विहे येथील विनोद पाटील यांचे घरापासून ते अरूण पाटील यांचे घरापर्यंत अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, नारळवाडी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, नावडी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, मोरगिरी येथे सभामंडप दुरूस्ती करणे व सुशोभिकरण करणे १० लक्ष, गोकुळ तर्फ पाटण येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, कुठरे येथील अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, वाझोली अंतर्गत सलतेवाडी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, धामणी येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, मौजे डाकेवाडी येथे अंतर्गत कॉंक्रीटीकरण करणे ५ लक्ष, काळगाव अंतर्गत टेटमेवाडी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, करपेवाडी येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, चिखलेवाडी येथील स्मशानभूमी दुरूस्ती करणे १० लक्ष, म्होत्रे ता. कराड येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, सुर्यवंशीवाडी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, शिंदेवाडी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे ५ लक्ष, बिबी अंतर्गत सलतेवाडी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, बिबी अंतर्गत मकाईचीवाडी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, मेंढोशी वरची येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, म्हावशी येथे व्यायाम शाळा दुरुस्ती करणे व विस्तारिकरण करणे १५ लक्ष, घडामवाडी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, डेरवण येथे मागासवर्गीय वस्तीत सभामंडप दुरुस्ती करणे व सुशोभिकरण करणे ५ लक्ष, चाफळ येथील पोस्ट ऑफिस ते भांबेवाडी पोहच रस्ता सुधारणा करणे १० लक्ष, धायटी अंतर्गत खुडेवाडी येथील सभामंडप दुरुस्ती करणे ५ लक्ष, दाढोली येथे ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधणे १० लक्ष, गोवारे येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, घाटमाथा येथे मुस्लीम वस्ती येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, वांझोळे अंतर्गत डोणीचावाडा येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, कामरगांव सभा मंडप बांधणे १० लक्ष, येराड येथील खंडुचावाडा येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, बनपेठ येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, मारूल तर्फ पाटण येथे गुरव वस्ती अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, नेचल येथे संरक्षक भिंत बांधणे व अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व गटर्स बांधणे १० लक्ष, कारवट धनगरवस्ती ते पावनाईदेवी मंदिर रस्ता सुधारणा करणे १० लक्ष, जोगेटेक येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, शिरळ अंतर्गत ताईचीवाडी येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, घाणबी येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, केर येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे १० लक्ष, मेष्टेवाडी येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, राहुडे येथील मारूती मंदिर येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, दुसाळे येथे सभामंडप बांधणे १० लक्ष, घोट अंतर्गत बोर्गेवाडी येथे केदारनाथ मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे ५ लक्ष, साईकडे येथील कांबळे वस्ती येथे बंदिस्त गटर अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे २० लक्ष, अशा एकूण पाटण तालुक्यातील ५५ विकासकामांच्यासाठी पहिल्याच टप्प्यात ५ कोटी २० लाख रुपयांच्या विकासकामांना मंजुरी मिळाली आहे.

## 'झीरो टॉलरन्स' धोरणाने राज्यातील कायदा-सुव्यवस्थेचा बेंचमार्क ठरवला

# डीसीपी मुंडेंच्या नेतृत्वाखाली अवैध दारू व शस्त्र साम्राज्याचा कणा मोडला

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.२३, पुणे :** राज्याच्या सीमा ओलांडून मध्यप्रदेशात गुप्तपणे पसरलेल्या अवैध दारू, शस्त्र पुरवठा आणि मोठे क्राईम नेटवर्क उध्वस्त करत पुणे पोलिसांनी नुकतीच एक ऐतिहासिक कारवाई यशस्वी केली आहे. ज्यामुळे संपूर्ण गुन्हेगारी जगतात प्रचंड खळबळ उडाली आहे.

या धाडसी व निर्भय 'ऑपरेशन मृत्यूघंटाचे नेतृत्व पुणे शहर परिमंडल – ४ च्या पोलीस उपायुक्त (डीसीपी) सोमया मुंडे यांनी केले. त्यांच्या कठोर, निष्करुण आणि शिस्तबद्ध नेतृत्वामुळे ही कारवाई केवळ यशस्वी झाली नाही, तर ती आंतरराज्यीय गुन्हेगारीविरोधातील लढ्यात राज्यातील कायदा–सुव्यवस्था व्यवस्थापनाचे 'बेंचमार्क मॉडेल' म्हणून उदयास आली आहे.

गुप्त माहितीच्या आधारे डीसीपी सोमया मुंडे यांच्या पथकाने मध्यप्रदेशातील दोन वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये सलग छापेमारीची मोहीम राबवली. या कारवाईत अवैध दारूचा प्रचंड साठा (शेकडो पेट्या), लाखो रुपयांचा काळाबाजार



मूल्य असलेला उच्च क्षमतेच्या देसी–विदेशी दारूचा बॅचलॉट, अनेक चोरीची वाहने आणि धोकादायक शस्त्रसाठा (देशी कट्टे, बंदुका, कारतूस आणि इलेक्ट्रॉनिक डिव्हाइसेस) एकाच साखळीत जप्त करण्यात आला.

इतका प्रचंड माल एकाच गिरोहाकडे आढळणे हे राज्यातील गुन्हेगारी नेटवर्क किती खोलवर रुजले होते, याचे गंभीर द्योतक आहे. स्थानिक गुन्हेगारी मंडळी आणि बाहेरील सूडगिरी टोळ्यांच्या या संगनमताच्या व्यवहाराचा 'लोहमुठीतून संपूर्ण साठा कोसळला'.

सोमया मुंडे यांच्या कुशलतेने आखलेल्या 'ब्लॅक मोड' रणनीतीमध्ये गुप्त पाळत, लक्ष्य निश्चिती, आणि ऑपरेशनदरम्यान दाखवलेली शिस्तबद्ध समन्वयक क्षमता निर्णायक ठरली. त्यांनी मध्यप्रदेशातील स्थानिक यंत्रणांसोबत अत्यंत सफाईदारपणे समन्वय साधला, ज्यामुळे कोणतीही माहिती लीक न होता ही कारवाई राष्ट्रव्यापी दर्जाची ठरली. गुन्हेगारी साखळीचा मजबूत कणा मानल्या जाणाऱ्या पुरवठा मार्गावरच थेट हल्ला केल्यामुळे संपूर्ण नेटवर्क कोसळून पडले.

अत्यंत निर्भीड, निर्णयक्षम आणि गुन्हेगारीविरोधात शून्य–सहनशीलतेच्या भूमिकेमुळे ओळखल्या जाणाऱ्या डीसीपी सोमया मुंडे यांच्या नेतृत्वाने ही धडाकेबाज कारवाई राज्यांतर गुन्हेगारीवर पुणे पोलिसांची ताकद, बुद्धिमत्ता आणि तडफ काय असते हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. राज्यातील कायदा रक्षकांना प्रेरणा देणारी आणि गुन्हेगारीला धडकी भरवणारी ही मोहीम आता इतिहासात नोंदली जाणार आहे.

## विद्यार्थ्यांनी घेतली कृषि महाविस्तार एआय ॲपची माहिती

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२३, मंडणगड (रत्नागिरी) :** येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुणवत्ता हमी कक्षा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभाग व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने 'कृषि विभाग ॲपवरील विविध योजना' तसेच स्पर्धा परीक्षा तयारी या विषयावर मंडणगड तालुका कृषि अधिकारी सोमनाथ आहेरकर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.वाल्मिक परहर उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.संदीप निर्वाण, डॉ.महेश कुलकर्णी, स्पर्धा परीक्षा विभागप्रमुख डॉ.भरतकुमार सोलापूरे, जी.के. अभंग, एस.एम.पवार, आर.एस.मर्चंड, बी.एन.नागरगोजे, जे. एम.पाटील, श्री.माळी, श्री.तळेकर, डॉ.दगडू जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. भारी प्राचार्य डॉ.वाल्मिक परहर यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे शब्दसुमनाने स्वागत करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तत्पूर्वी स्पर्धा परीक्षा विभागप्रमुख डॉ. भरतकुमार सोलापुरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

# वारे शिक्षक! घटस्फोटीत दाखवून बदल्या करुन घेतल्या

## प्राथमिक शाळेतल्या शिक्षिकांचा कारनामा, बोगस प्रमाणपत्रांआडून सहानुभूतीचा खेळ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहिल्यानगर :** घटस्फोटित किंवा परित्यक्ता असल्याचा बनावट मुखवटा लावून बदलीत सवलत मिळवणाऱ्या दोन प्राथमिक शिक्षिकांचे अखेर भांडाफोड झाले आहे.

जिल्हा परिषदेच्या चौकशीत सोहनी सुभाष पुरनाळे व जयश्री हरिश्चंद्र रहाटडे या दोन शिक्षिका विभक्त नसतानाही बनावट कागदपत्रांच्या आधारे बदलीच्या सुविधा घेत असल्याचे उघड झाल्याने, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांना तात्काळ निलंबित केले आहे.

जिल्हा परिषदेत अनेक कर्मचारी घटस्फोटित, परित्यक्ता, दुर्धर आजार, दिव्यांग अशा विविध कारणांची खोटी कारणे पुढे करून बदलीत प्राधान्य मिळवतात, अशी तक्रार सातत्याने समोर येत होती.

**इतर तालुक्यांतून क्लीन चिट पण प्रश्न कायम**

पारनेर, कर्जत, श्रीरामपूर आणि नेवासा येथील समित्यांनी दिलेले फेर अहवाल मात्र सर्वांना निर्दोष ठरवतात. परंतु तपास प्रकिया ढिसाळ असल्याचा आरोप अद्याप कायम असून, अनेकांकडून अजूनही सवलत मिळवण्यासाठी खोट्या सहानुभूतीचे नाटक सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

**निलंबन पुरेसे नाही, बडतर्फ करा**

बनावट प्रमाणपत्रांवर बदलली सवलत मिळवणे हा थेट प्रशासनाची फसवणूक आणि जनतेच्या विश्वासाचा विश्वासघात असल्याचे सांगत पंचमुख यांची मागणी अधिक तीव्र झाली आहे. या शिक्षकांना फक्त निलंबित न करता तात्काळ बडतर्फ करा आणि गुन्हे दाखल करा, अशी मागणी केली आहे. या कारवाईनंतर जिल्हा परिषदेतील इतर अशा अनेक कागदी परित्यक्तांवर कारवाईची तलवार लोंबकळू लागली आहे.

या बद्दल काही दिवसांपूर्वी चंद्रशेखर पंचमुख यांनी या फसवणुकीबाबत लेखी तक्रार दाखल केली होती. त्याअन्वये ५८ शिक्षिकांची तपासणी समित्यांमार्फत करण्यात आली. त्यात अहिल्यानगर तालुक्यातील वरील दोन्ही शिक्षिका प्रत्यक्षात विभक्त राहत नसल्याचे स्पष्ट झाल्यावर प्रशासनाने कारवाईला सुरुवात केली. अनेक वेळा समित्या गठित होऊन ही दोषींना वाचविणारे खोटे अहवाल दिले गेल्याचे ही धक्कादायक वास्तव पुढे आले आहे. यामुळे पूर्वीचे गैरप्रकार दडपवणाऱ्या समित्यांवरच कारवाई करा, तसेच अधिक काटेकोर फेरतपासणी करा, अशी मागणीही पंचमुख यांनी पुन्हा केली आहे.

# ज्युनिअर नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये साईशा पवारने हर्डल्स शर्यतीत पटकाविले 'रजत पदक'



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, ठाणे :** ठाण्याची उदयोन्मुख क्रीडापटू साईशा विशाल पवार (वय १५) हिने राष्ट्रीय स्तरावर नेत्रदीपक कामगिरी करत ठाणे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. नुकत्याच ओडिशातील भुवनेश्वर येथील कलिंगा स्टेडियममध्ये पार पडलेल्या ज्युनिअर नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये सायेशाने अडथळा शर्यतीत (Hurdles) रजत पदक पटकाविले आहे. साईशा ट्रायथलॉन, पेंटाथलॉन आणि हर्डल्स या क्रीडा प्रकारांत प्रावीण्य मिळवत आहे. तिने आतापर्यंत चार वेळा राष्ट्रीय स्तरावर सहभाग घेतला आहे. या राष्ट्रीय पदकापूर्वी, साईशाने जिल्हा आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पेंटाथलॉन आणि हर्डल्स शर्यतीत सुवर्णपदके जिंकून आपली प्रतिभा सिद्ध केली आहे. याविषयी आपल्या भावना व्यक्त करताना साईशा म्हणाली की, या यशामागे माझे प्रशिक्षक दर्शन देवरुखकर आणि सदाशिव पांडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. प्रशिक्षकांच्या अचूक मार्गदर्शनामुळेच मला हे यश मिळविता आले.

या प्रवासात माझ्या कुटुंबाचाही मोठा पाठिंबा आहे. माझे आई-वडील आणि आजी-आजोबा यांच्यासह माझी ९० वर्षांची पणजी सरला पत्रुटकर ही प्रत्येक यशानंतर माझी पाठ थोपटून प्रोत्साहन देतात तेव्हा कुटुंबाचा हा भक्कम आधार माझ्यासाठी नेहमीच प्रेरणादायी ठरतो. भविष्यातील ध्येयाबद्दल बोलताना साईशा म्हणाली, भविष्यातही मी अशीच मेहनत करीत राहीन आणि भारताचे प्रतिनिधित्व करेन. ऑलिम्पिकमध्ये देशाचा अभिमान वाढेल, अशी कामगिरी करण्याचे माझे स्वप्न आहे. साईशा पवारच्या या कामगिरीबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे आणि तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.


# पेण मधील ओम साई पदयात्रा मित्र मंडळातर्फे शिर्डी पायी पदयात्रा दिंडी

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२३, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील श्री साई बाबांची मानाची पालखी मिरवणूक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण तर्फे यावर्षीही पेण ते शिर्डी अशी पायी पदयात्रा पेण मधून निघाली आहे. त्यापूर्वी भव्यदिव्य मिरवणुकीचे पेण शहरात आयोजन करण्यात आले होते. शहरातील साई मंदिर कासार तलाव येथून सायंकाळी साडे चार वाजता विद्युत रोषणाई, ब्रॉसबँड पथकाच्या सुंदर संगीताच्या तालावर निघालेल्या मिरवणूक सोहळ्यामध्ये चलचित्र रथ यामध्ये द्वारकामाई मंदिर, बैलगाडी हाकताना साईबाबा, हुबेहुब दिसणारे साईबाबा यांचा विशेष समावेश होता.

पेण साई मंदिरा पासून सुरू झालेली ही मिरवणूक तेरा घरांची आळी, चावडी नाका, आंबेडकर चौक, नगरपालिका चौक, राजू पोटे मार्ग, कोळीवाडा, महाविर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कासार आळी, हनुमान आळीमार्गे पुन्हा साई मंदिरात परतली. पालखी मार्गावर सर्वत्र भगवे पताके, भगवे झेंडे लावण्यात आले आहेत. घरासमोर मिरवणूक आल्यानंतर प्रत्येक महिला आरती ओवाळून औक्षण करण्यात आले. शेवटी साई बाबांच्या मंदिरात महाआरतीने व महाप्रसादाने मिरवणुकीची सांगता झाली.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी साईमंदिरात आरती करून साई बाबांची पालखी पायी चालत शिर्डीकडे मार्गस्थ झाली. गेली १७ वर्ष ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण ते शिर्डी पर्यंत साई पालखीची सेवा करत आहेत. सदर मिरवणूक पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी ओम साई पदयात्रा मित्र मंडळाचे सर्वेसर्वा कल्पेश ठाकूर, मितेश भानुशाली व त्यांचे शेकडो



सहकारी हा पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतात.

शिर्डीला निघालेल्या या पालखी पदयात्रेत पेण शहरासह तालुक्यातील अनेक तरुण सामील झाले आहेत. सदर पालखी शुक्रवार, दि.२८ नोव्हेंबर २०२५ रोजी शिर्डीला पोहोचणार आहे. त्यानंतर साईबाबांचे दर्शन करून पुन्हा सर्व पदयात्री भक्त पेणच्या दिशेने परत येण्यासाठी निघणार असल्याची माहिती कल्पेश ठाकूर यांनी बोलताना दिली.

# भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांविषयी प्रा.आवटे यांचे विचारप्रवर्तक व्याख्यान

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, नवी मुंबई :** अमृतमहोत्सवी संविधान पर्वाच्या अनुषंगाने २६ नोव्हेंबर रोजीच्या संविधान दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात सुप्रसिद्ध लेखक, व्याख्याते प्रा.श्रीरंजन आवटे यांनी 'नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेले संविधानातील मूलभूत हक्क' या विषयावरील उद्बोधक व्याख्यानातून 'भारतीय संविधानाचा आत्मा' म्हणून बाबासाहेबांनी संबोधलेल्या संविधानातील २२ विभागांपैकी तिसऱ्या अत्यंत महत्त्वाच्या विभागातील कलम १२ ते ३५ उलगडून सांगितले.नवी मुंबई महानगरपालिकेने उभारलेले बाबासाहेबांचे अप्रतिम स्मारक पाहून मी भारावून गेलो असे सांगत प्रा. श्रीरंजन आवटे यांनी स्मारकातील विविध दालनांना भेटी देताना टाईम मशीनमध्ये बसून बाबासाहेबांसोबत चालतोय असा अनुभव आल्याचे कथन केले. शिक्षण विभागाच्या उपायुक्त तथा भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या प्रमुख संघरत्ना खिल्लारे यांनी महानगरपालिकेच्या वतीने व्याख्यात्यांचे स्वागत केले.

याप्रसंगी स्मारकाच्या सल्लागार संध्या अंबादे उपस्थित होत्या.आपल्या व्याख्यानामध्ये प्रा.श्रीरंजन आवटे यांनी संविधानाची निर्मिती ही तीन ते चार वर्षात झाली असली तरी त्या पाठीमागे १५० हून अधिक वर्षांची परंपरा असल्याचे सांगत, संविधानात अशी चिरंतन मूल्ये आहेत जी पुसता येणार नाहीत असे मत व्यक्त केले. 'उद्देशिका ही संविधानाचे ओळखपत्र' या नाना पालखीवाला यांच्या विधानाचा उल्लेख करीत 'समाजाचा जीपीएस स्वप्न नकाशा'



म्हणजे संविधान असा वेगळा विचार त्यांनी मांडला. उद्देशिका समजली की भारतीय संविधानाचे व्याकरण समजते असे सांगताना भारतातील लोकांनी स्वतः ला हे संविधान अर्पण केले आहे त्यामुळे लोकांची जबाबदारी मोठी असल्याचे ते म्हणाले.

काय नाकारायचे हे बाबासाहेबांनी सांगितलेच त्यासोबतच काय स्वीकारायचे हे पण त्यांनी सांगितले. विषमतेला नकार व समतेला होकार हे बाबासाहेबांचे विचार आपण समजून घेत नाही म्हणून पुन्हा पुन्हा संविधान समजून घेण्याची गरज भासते असे मत प्रा.श्रीरंजन आवटे यांनी व्यक्त केले

.इतिहासातील विविध दाखले देत, संविधानातील मूल्यांची वेगवेगळ्या उदाहरणांतून मांडणी करत संविधानातील विविध कलमांच्या पाठांतरापेक्षा त्या पाठीमागचा आशय समजून घेणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. व्याख्यानाच्या विषयाच्या अनुषंगाने संविधानातील मूलभूत हक्काविषयी १२ ते ३५ कलमांच्या माहितीची उदाहरणासहित मांडणी त्यांनी केली. संविधानाकडे बघण्याचा वेगळा दृष्टिकोन आज व्याख्यानातून मिळाला अशी प्रतिक्रिया याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित श्रोत्यांनी दिली.

# कल्याण - डोंबिवलीत ऑनलाइन जुगाराला ऊत

## प्रशासनाच्या उदासीनतेवर समाजसेवक मनोज गिरी यांची टीका



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२३, डोंबिवली (ठाणे) :** कल्याण - डोंबिवली परिसरात ऑनलाइन गेमिंगच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन जुगार सुरू असल्याचा गंभीर आरोप समाजसेवक मनोज गिरी यांनी केला आहे. स्थानिक जनप्रतिनिधी, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी पोलिस विभागाला लेखी तक्रारी करून ही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे चित्र आहे. राज्य सरकार आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी ऑनलाइन जुगारबंदीबाबत स्पष्ट आदेश दिले असताना ही स्थानिक प्रशासन टाळाटाळ करीत असल्याचा आरोप गिरी यांनी केला.

प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे सामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांची प्रचंड फसवणूक होत असून, लाखो रुपयांचा शासकीय महसूल ही बुडत असल्याचे ते म्हणाले. स्थानिक पातळीवर अवैध जुगार रॅकेट्स खुलेआम सुरू आहेत. नागरिकांच्या तक्रारी असूनही संबंधित विभाग कारवाई न करण्यामागे कोणते हितसंबंध आहेत, हा मोठा प्रश्न आहे, अशी टीका समाजसेवक मनोज गिरी यांनी केली. या संदर्भात अधिक कठोर पाऊले उचलण्याची मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली असून, नागरिकांमध्ये ही संतापाचे वातावरण आहे.

# विंचूर ग्रामपंचायतीकडून नागरिकांना मोठा दिलासा

## घरपट्टी थकबाकीदारांना ५० टक्के सवलत जाहीर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२४, विंचूर (नाशिक) :** शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान - २०२५ अंतर्गत विंचूर ग्रामपंचायतीने घरपट्टी थकबाकीदारांसाठी मोठी सवलत जाहीर केली आहे. महिला सभा, मासिक सभा व ग्रामसभेच्या मंजुरीनंतर ग्रामपंचायतीने थकीत घरपट्टीच्या मूळ रकमेवर तब्बल ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेत तसे परिपत्रकच जारी केले आहे. विशेष म्हणजे, ही योजना २१ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या मर्यादित कालावधीतच लागू राहणार आहे. ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या १३ नोव्हेंबरच्या शासन निर्णयानुसार राज्यभरात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने विंचूर ग्रामपंचायतीने ग्रामसभेत २० व २१ नोव्हेंबर रोजी विशेष बैठका घेऊन हा निर्णय एकमताने मंजूर केला. गावाच्या महसूल वसुलीला चालना मिळावी आणि ग्रामपंचायतीची आर्थिक क्षमता वाढावी हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे ग्रामपंचायत प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सवलत रक्कम, कालावधी किंवा अटींबाबत कोणताही आक्षेप असल्यास कर भरल्यापासून १५ दिवसांच्या आत ग्राम पंचायतीकडे लेखी स्वरूपात तक्रार सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. नियुक्त समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहणार असल्याचे प्रशासनाने कळविले आहे. सरपंच, उपसरपंच सर्व सन्माननीय सदस्य व ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी वृंद यांनी सर्व निवासी करदात्यांना आवाहन केले आहे की, शासनाच्या या विशेष सवलतीचा लाभ घेऊन दि. ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी आपली थकीत घरपट्टी भरावी. यामुळे ग्रामपंचायतीच्या विकासकामांना आवश्यक निधी उपलब्ध होईल व गावाच्या प्रगतीला वेग येईल, असेही नमूद केले आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने स्पष्ट केले आहे की ही योजना संपूर्णपणे पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने राबविण्यात येईल.

> सर्व नागरिकांनी या कर सवलतीचा जास्तीच जास्त फायदा घ्यावा. शासनाने मोठी सवलत उपलब्ध करून दिली आहे. गावच्या विकासासाठी नागरिकांनी सहकार्य करावे.
>
> **- सचिन दरेकर (सरपंच)**

# सेंचुरी रेयॉन हायस्कूल येथे राज्यस्तरीय शालेय रग्बी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात संपन्न



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.२३, ठाणे :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे द्वारा आयोजित राज्यस्तरीय शालेय रग्बी क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन दि.२१ ते २३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत सेंचुरी रेयॉन हायस्कूल येथे करण्यात आले होते.





या स्पर्धेचे उद्घाटन दि.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी उपायुक्त, क्रीडा उल्हासनगर महानगरपालिका श्रीम.स्नेहा कर्पे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष आव्हाड , आंतरराष्ट्रीय रग्बी खेळाडू सचिन म्हसकर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सेंचुरी रेयॉन हायस्कूलचे कार्यकारी प्रमुख श्रीकांत गोरे, सेंच्युरी रेयॉन चे वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद भांडारकर, बी.के.बिर्ला महाविद्यालय तसेच शाळा व्यवस्थापनाचे मुख्याध्यापक तसेच संचालक कुलगुरू डॉ. नरेशचंद्र, सेंचुरी रेऑन शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना बदाने, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, पर्यवेक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील आठ विभागांमधून मुलामुलींचे एकूण सोळा संघ सहभागी झाले होते. या संघांमधून मुलींच्या गटात लातूर विभागाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून नागपूर तसेच छत्रपती संभाजी नगर यांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले.

तर १४ वर्षाखालील मुले या गटात प्रथम क्रमांक कोल्हापूर या विभागास प्राप्त झाला असून लातूर व मुंबई या विभागांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले.

ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेमधून स्पर्धेत सहभागी सर्वच आठही विभागातील खेळाडूंना उत्तम प्रतीचे ट्रॅक सूट देण्यात आले.

तसेच स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या खेळाडूंना सन्मानचिन्ह, मेडल आणि प्रत्येक विजयी खेळाडूला स्मार्ट वॉच देण्यात आले.

ही स्पर्धा अत्यंत उत्साहाने खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या स्पर्धेकरिता जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ तसेच सेंचुरी रेयॉन हायस्कूलचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.


# विंचूरमध्ये श्री खंडेराव महाराज नवरात्र सोहळ्यानिमित्त मल्हारी सप्तशती पाठ वाचन

## ग्रामदैवत श्री खंडेराव महाराजांच्या मंदिरात मल्हारी सप्तशती पठण सोहळा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२३, विंचूर (नाशिक) :** अखंड महाराष्ट्राचे व विंचूर ग्रामस्थांचे ग्रामदैवत श्री खंडेराव महाराज नवरात्र सोहळ्यानिमित्त गावातील भाविकांसाठी विशेष धार्मिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री खंडेराव महाराज यांचे आवडते श्री मल्हारी सप्तशती पाठ वाचन सोहळा सोमवार, दि.२४, २५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता श्री खंडेराव महाराज मंदिर, विंचूर येथे पार पडणार



आहे.

या पठणामध्ये ऋषी-मुनी संवाद, मणी-मलासूर त्रास, देवतांची भगवान शिवास प्रार्थना, मल्हारी अवतार, युद्ध आणि वध, जेजुरी निवास विनंती, हळदीचे महत्व, मल्हारी उपासनेचे विधी, देव प्रसन्न करण्याचे मार्ग तसेच घरगुती पूजेची परंपरा यांसारख्या महत्त्वपूर्ण धार्मिक घटकांचा समावेश आहे. भाविकांनी या सेवेत सहभागी होऊन आपली सेवा श्री खंडेराव महाराजांच्या चरणी अर्पण करावी, असे आवाहन श्री खंडेराव महाराज भक्त मंडळ आणि श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, विंचूर यांनी असे केले आहे.

# महानगरपालिका निवडणूक मतदार यादी संबंधी हरकती व सूचना २७ नोव्हेंबरपर्यंत दाखल कराव्या

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, मुंबई :** महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन संबंधित महानगरपालिका आयुक्त स्तरावर केले आहे. या बाबत काही हरकती व सूचना किंवा तक्रारी असल्यास दि.२७ नोव्हेंबर २०२५ रोजीपर्यंत संबंधित महानगरपालिकेत दाखल कराव्यात, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्यांकरिता १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून, त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्या या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहेत. या मूळ मतदार याद्या भारत निवडणूक आयोगाने तयार केल्या आहेत. त्यांचे प्रभागनिहाय विभाजन संबंधित महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्तांच्या देखरेखीखाली करण्यात आले आहे. त्यानुसार २० नोव्हेंबर २०२५ रोजी संबंधित महानगरपालिकेच्या ठिकाणी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यातील मतदारांचे नाव https://mahasecvoterlist.in/jectionOnClick/SearchName या संकेतस्थळावर पाहता येईल.

त्यावर २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. प्रभागनिहाय मतदार याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे अथवा नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरूस्ती करणे इ. स्वरूपाची कार्यवाही केली जात नाही. मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुकांसंदर्भात, तसेच मतदाराचा चुकून प्रभाग बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्तांकडे दाखल करता येतील, असेही राज्य निवडणूक आयोगाने कळविले आहे.

# ठाणे महानगरपालिकेच्या सुधारित मतदार याद्यांवरून वाद

## मनसे अविनाश जाधव आक्रमक; आंदोलन करण्याच्या मूडमध्ये

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२३, ठाणे :** ठाणे महानगरपालिका निवडणुकीपूर्वी सुधारित मतदार याद्यांमध्ये गंभीर गैरप्रकार झाल्याच्या आरोपांमुळे शहरात राजकीय तणाव निर्माण झाला आहे. ठाणे-पालघर मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी या याद्या सत्ताधारी पक्षाला अनुकूल असलेल्या पद्धतीने तयार केल्याचा आरोप केला आहे आणि आज ठाणे महानगरपालिका मुख्यालयात आक्रमक आंदोलन करण्याची धमकी दिली आहे.

मनसेच्या मते, गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यावेळी मतदारांची संख्या अचानक ४.२१ लाखांनी वाढली आहे आणि प्रत्येक प्रभागात दहा हजारांहून अधिक मतदार का जोडले गेले याचे स्पष्टीकरण द्यावे. नकाशा मर्यादेबाहेर एक किलोमीटर अंतरावरील घरे देखील मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत, असा आरोप आहे. निषेध म्हणून अविनाश जाधव यांनी यादी तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे.

२२ नोव्हेंबर रोजी अविनाश जाधव यांनी नौपाडा कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. नंतर, जेव्हा त्यांनी महानगरपालिका निवडणूक विभागाला भेट दिली तेव्हा निवडणूक अधिकारी बाळू पिचड कार्यालयात उपस्थित नव्हते आणि जेव्हा त्यांना एका लग्न समारंभात गेल्याचे कळले तेव्हा अविनाश जाधव आणि मनसे कार्यकर्त्यांनी बोगस अधिकारी है है, मत चोर है है अशा घोषणा दिल्या. योग्य उत्तर न मिळाल्यास सोमवार,



दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी महानगरपालिकेतच कडक आंदोलन केले जाईल आणि ही आमची निवडणूक मोहीम असेल, असा इशारा अविनाश जाधव यांनी जाहीरपणे दिला आहे.

त्यांनी संताप व्यक्त करत म्हटले आहे की जर बोगस मतदार असतील तर बोगस मतदार पायी मतदान करण्यासाठी येतील. परंतु ते स्वतःहून घरी जाऊ शकणार नाहीत याची आम्ही दक्ष राहू. कृती आणि सूचनांसाठी २७ नोव्हेंबरची अंतिम मुदत खूपच कमी आहे आणि ती वाढवावी लागेल, असे मनसेचे म्हणणे आहे.

पोलिस विभागाला मिळालेल्या अंतर्गत माहितीनुसार, अविनाश जाधव हे त्यांच्या आक्रमक नेतृत्वासाठी ओळखले जातात, त्यामुळे (आज) महानगरपालिकेत आंदोलन, ओरड, शाई फेकणे, काळे झेंडे, मारहाण किंवा कार्यालयात तोडफोड यासारख्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत परिस्थिती गंभीर वळण घेऊ शकते.

सध्या ठाणे पोलिस आणि प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि अविनाश जाधव यांच्याशी चर्चा करून परिस्थिती शांत करण्याचा विचार महापालिका प्रशासन करत आहे. आज सोमवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी वाढत्या दबावासह मनसे पुन्हा महापालिकेत बैठक किंवा निषेध करण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण शहरात राजकीय उष्णता शिगेला पोहोचत आहे.

# शिवसेना उमेदवाराच्या गाडीने अनेक वाहनांना उडवलं

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२२, अंबरनाथ (ठाणे) :** अंबरनाथ उड्डाणपुलावर शुक्रवारी सायंकाळी भीषण अपघाताची घटना घडली.

भरधाव कारच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कारने समोरून येणाऱ्या दोन ते तीन दुचाकींना जोरदार धडक दिली. यानंतर ही कार उलटली. या भीषण अपघातात कार चालक, तसेच दुचाकींवरील तीन जण अशा चौघा जणांचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी झाले आहेत. कार चालकाला हृदयविकाराचा धक्का आल्यानंतर हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

या घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या अपघातामुळे उड्डाणपूल, कल्याण, बदला मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत पोलिस अधिक तपास करत होते.